भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०२/२०१८

**१) संगनमत करून जुण्या भांडणाच्या वादावरून डोक्यावर मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक २०/०२/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हेमराम मनोहर टेटे वय ३२ वर्ष रा. राजेन्द्र वार्ड झोपडपट्टी शुक्रवारी हा त्याचे मित्रा सोबत घरी जेवन करीत असता, यातील आरोपीतांनी संगनमत करून जुण्या भांडणाच्या वादावरून वाद घालुन दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीचे डोक्यावर पावडयाने मारून जखमी केले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२६,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/०२/२०१८ चे १८.३५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी– पिवळी वाहन ही सिहोरा बसस्थानक येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. सार्वे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. सार्वे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान चिमुकल्याचा मृत्यु :–**

दिंनाक २१/२/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील मृतक आकाश जगदिश गुप्ता वय ०२ वर्ष, रा. आझाद वार्ड भंडारा याची प्रकृती अचानक खराब झाल्याने, त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून व मृतकचे वडीलाचे बयान तसेच सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना.सार्वे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :–**

दिंनाक २०/२/२०१८ चे ९.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. उषा सुधाकर धार्मीक वय ५० वर्ष रा. इंदीरा नगर तुमसर ही १०० टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने, डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. राघोर्ते यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा चिचखेडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) महिलेचा मृत्यु:–**

दिंनाक २०/२/२०१८ चे १०.०० ते १८०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. प्रभा भाऊराव वासलकर वय ४८ वर्ष रा. वाकल ही फिर्यादीची पत्नी असुन दि. २०/०२/२०१८ ला ती दुस–यांचे शेतावर मीर्ची लागवटीतील कचरा (खदान) काढण्यासाठी मजुरीने जाण्याकरीता तीची मुलगी कु. ममीता हीस मी जुने घरून फावडी आनते, म्हणुन घरी गेली, परंतु ती सायंकाळ पर्यत न दिसल्याने, मृतकचे मुलीने जुने घरी जाऊन पाहीले असता, मृतकचे प्रेत तिचे राहते घराचे धाब्यावर पडुन दिसुन आल्याने, फिर्यादी भाऊराव सखाराम वासलकर वय ४८ वर्ष रा. वाकल यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

६) बोरीक पॉवडर खाल्याने महिलेचा मृत्यु :—

दिंनाक २०/२/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. शिल्पा सुनिल वासनिक वय ३० वर्ष रा. हनुमान वार्ड पेट्रोलपंप ठाणा हिने तिचे राहते घरी बोरीक पॉवडर खाल्याने तीला तीचे पतीने औषधोपचारा करीता डॉ. चौव्हान भंडारा येथे भरती केले, तेथुन मृतकला पुढील उपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे रेफर केले असता, तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने, डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोशी. सारोख यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर करीत आहेत.

७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—

दिंनाक २०/२/२०१८ चे १८.३० ते १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक घनश्याम परसराम भांडारकर वय ५५ वर्ष रा. देव्हाडा हा दि. २०/०१/२०१८ चे सांयकाळी आपले मोटार सायकने शेतावरून घरी परत येत असता समोरील वाहनाच्या लाईटचा प्रकाश त्याचे डोळयावर आल्याने, रोडचे स्लोपवरून मोटार सायकल ही स्लिप होवुन, त्याचे डोक्याला मार लागल्याने, त्यास औषधोपचारा करीता रेडीशन दवाखाना नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान दि. २८/०१/२०१८ चे ०९.२० वाजता दरम्यान मरण पावल्याने, पो.स्टे. सिताबर्डी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सोलंखी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा सलामे पो.स्टे. करडी करीत आहेत.

८) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २१/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू कमती १५,००/रु. माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २१/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनाकरीता ०२ ईतर वाहनांवरती — ७५ केसेस करण्यात आले आहे.

PSI

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता